RNI No. MAHBIL /2009/37831

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक १००] शुक्रवार, जुलै २६, २०१९/श्रावण ४, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जुलै २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय, अधिनियम.**

क्रमांक संकीर्ण ०८१६/४८३/प्र.क्र.११४/का-११.—महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ (१८६९ चा १४) याच्या कलम १४ व १९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत महसूल तालुक्यांशी संबंधित असतील तेथवर, त्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असा निदेश देत आहे की, दिनांक २७ जुलै २०१९ पासून;

(क) रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय असेल आणि जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल हे, उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील;

(ख) उक्त न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमा ह्या, रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर आणि कर्जत महसुली तालुक्यांच्या क्षेत्रांशी समव्यापी असतील त्या स्थानिक सीमांमध्ये त्या महसुली तालुक्यांना मिळून बनलेल्या क्षेत्रांचा समावेश असेल; आणि

(ग) उक्त अधिनियमाच्या कलम ९ अन्वये प्रधान जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांच्याकडे निहित केलेले असतील असे अधिकार वगळता, आणि त्यांना योग्य वाटतील अशी प्रकरणे जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल यांच्याकडे सोपवण्याचा अथवा ती स्वतःकडे घेण्याचा अथवा एखाद्या सक्षम अधिकारिता असणाऱ्या दुसऱ्या न्यायालयाकडे सोपवण्याचा त्यांचा अधिकार वगळता, रायगड जिल्ह्यांतील पनवेल, उरण, खालापूर आणि कर्जत या महसुली तालुक्यासंबंधातील प्रधान जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांचे इतर सर्व अधिकार हे, उक्त जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल, यांचेकडे निहित होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**
शासनाचे सहसचिव.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 18th July 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURT ACT.

No. SANKIRNA 0816/483/C.R.114/DESK-11.—In exercise of the powers conferred by sections 14 and 19 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all other earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the revenue talukas of Panvel, Uran, Khalapur and Karjat in Raigad District, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from the 27th July, 2019.

(*a*) there shall be a Court of District Judge at Panvel and the said Court shall be presided over by the District Judge-1, Panvel;

(*b*) the local limits of the ordinary jurisdiction of the said Court shall be co-extensive with and shall cover the areas comprising the revenue talukas of Panvel, Uran, Khalapur and Karjat in Raigad District;

(*c*) all the powers of the Principal District Judge, Raigad-Alibag in respect of the revenue talukas of Panvel, Uran, Khalapur and Karjat in Raigad District shall vest in the said District Judge-1, Panvel, except those vested in the Principal District Judge under section 9 of the said Act and except his power to assign to the District Judges at Panvel or withdraw unto himself or to assign to another Court of competent jurisdiction, such matters as he thinks fit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Y. H. AMETA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.